महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.३४८/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७५ दिनांक १० / १२ / २०१३

विषय : राष्ट्रपुरुष/थोर व्यक्तींच्या जयंत्या तसेच राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत - अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती.

संदर्भ : अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०११/१०६९/ प्र.क्र.४१८/२९, दि.१६ नोव्हेंबर २०१३.

.....

राष्ट्रपुरुष तसेच थोर व्यक्तींच्या जयंत्या व राष्ट्र दिनाचे कार्यक्रम शासनामार्फत साजरे करण्यात येतात. सदर कार्यक्रम राष्ट्रपुरुषांचे/थोर व्यक्तींच्या कार्याचे चिरंतन स्मरण व त्यांचे प्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याच्या भावनेतून आयोजित करण्यात येतात. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, सदर कार्यक्रमास अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अत्यंत नगण्य असते.

२. राष्ट्रपुरुष तसेच थोर व्यक्तींच्या जयंत्या व राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमासाठी अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. या अनुषंगाने अशा कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन आता शासनाने परिपत्रक क्र.संकीर्ण २०११/१०६९/प्र.क्र.४१८/२९, दि.१६ नोव्हेंबर २०१३ अन्वये स्वयंप्रेरणेने सर्व अधिकारी व कर्मचारी अशा कार्यक्रमांना उपस्थित राहतील याबाबतच्या योग्य उपाययोजना करण्यात याव्यात व या कार्यक्रमांना उपस्थिती हा कार्यालयीन शिस्तीचा भाग समजावा अशा सूचना पारित केलेल्या आहेत. सदर दि.१६ नोव्हेंबर २०१३ च्या शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

३. सबब, सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या दि.१६.११.२०१३ च्या शासन परिपत्रकातील सूचनांचे अवलोकन करावे व राष्ट्रपुरूष/थोर व्यक्तींच्या जयंत्या तसेच राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे होताना बहुसंख्य अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहतील या बाबतची दक्षता घ्यावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

**( संदेश ए. हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

राष्ट्रपुरुष/थोर व्यक्तींच्या जयंत्या तसेच राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम साजरे करण्याबाबत --
अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती---

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण २०११/१०६९/प्र.क्र.४१८/२९**
मंत्रालय,मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०० ०३२
तारीख: - १६ नोव्हेंबर,२०१३

**शासन परिपत्रक:-**

राष्ट्रपुरुष तसेच थोर व्यक्तींच्या जयंत्या व राष्ट्रीय दिनाचे कार्यक्रम शासनामार्फत साजरे करण्यात येतात. सर्व शासकीय-निमशासकीय कार्यालयांमध्ये हे कार्यक्रम साजरे करण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर कार्यक्रम राष्ट्रपुरुषांचे/थोर व्यक्तींच्या कार्याचे चिरंतन स्मरण व त्यांचे प्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करण्याच्या भावनेतून आयोजित करण्यात येतात. तथापि असे निदर्शनास आलेले आहे की, सदर कार्यक्रमास अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अत्यंत नगण्य असते. ही बाब कार्यालयीन शिस्तीच्या अनुषंगाने योग्य नाही.

२. राष्ट्रपुरुष तसेच थोर व्यक्तींच्या जयंत्या व राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमासाठी अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे. अशा कार्यक्रमाचे महत्व लक्षात घेऊन स्वयंप्रेरणेने सर्व अधिकारी व कर्मचारी अशा कार्यक्रमांना उपस्थित राहतील याबाबतच्या योग्य उपाययोजना करण्यात याव्यात व या कार्यक्रमांना उपस्थिती हा कार्यालयीन शिस्तीचा भाग समजावा. याअनुषंगाने सर्व मंत्रालयीन विभागाच्या आस्थापना शाखा प्रमुखांनी तसेच मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयातील आस्थापना शाखा प्रमुखांनी योग्य ती कार्यवाही करुन अशा कार्यक्रमांना बहुसंख्य अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहतील याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१३१११६११३२५४७२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravikant Ganpat Panchal

Digitally signed by Ravikant Ganpat Panchal
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Ravikant Ganpat Panchal
Date: 2013.11.16 11:31:39 +05'30'

र.ग.पांचाळ
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति

(१) मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई,
(२) मा.मुख्यमंत्री यांचे अमुपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
(३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई,
(४) मा.सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई,

(५) मा.मुख्य सचिव,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई,

(६) सर्व मंत्रालयीन विभागांचे मा.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई

(७) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता

(१) सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी

(२) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

(३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

(४) निवासी आयुक्त,महाराष्ट्र शासन,महाराष्ट्र सदन,कोपर्निकस मार्ग,नवी दिल्ली

(५) निवडनस्ती/कार्यासन-२९